!! श्री !!

# खासदार चंद्रकांत खैरे

## शिवसेना उपनेते

शिवसेना

जा.क्र. : खा.का.प्र.प ३९ १२/११/१५

प्रति,मा.श्री.संपादक साहेब,कृपया प्रसिद्धीसाठी

# मंदिर बचाव समिती कार्यालयाचे उद्घाटन

संभाजीनगर दि.१२ : माझे रक्त सांडले तरी बेहत्तर पण एकाही मंदिराला हात लावु देणार नाही, सोयीचा अन्वयार्थ लावुन प्रशासन हिंदु धार्मिक स्थळांवर घाला घालु पाहत आहे. कायद्याच्या लढाईत मंदिरावर घाला घालणाऱ्यांना शासन होईल यात शंका नाही. गाफिल राहु नका. त्यासाठी मंदिर बचाव समितीच्या माध्यमातुन न्यायालयीन लढ्यासाठी सज्ज व्हा असे आवाहनी मंदिर बचाव समितीचे संस्थापक अध्यक्ष शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांनी केले.

संभाजी पेठ येथील शिवसेना भवन येथे मंदिर बचाव समितीच्या कार्यालयाचे दीपावली पाडव्हाच्या मुहुर्तावर ह.भ.प. गंगाधरजी घुगे महाराज यांच्या हस्ते उद्घाटन झाले त्या प्रसंगी ते बोलत होते. प्राचीन, अती प्राचिन, वडिलोपार्जित धार्मिक स्थळे प्रशासन, आपले सरकार असतांना पाडत आहे याचे दुखः आहे. परंतु सरकार जरी आपले असले तरी हिंदु धर्मावरील कोणत्याही अत्याचार सहन केला जाणार नाही. शिवसेना मंदिर बचावसाठी सदैव हिंदुंच्या सोबत आहे असेही खासदार चंद्रकांत खैरे यावेळी म्हणाले. ह.भ.प.घुगे महाराज यांनी धार्मिक दृष्टांत सांगुन धर्मावर संकट येतात त्यावेळी तारणारे सुध्दा असतात या संकटाला तारण्यासाठी खासदार चंद्रकांत खैरे यांच्या पाठीशी उभे राहण्याचे आवाहन मंदिर बचाव समिती सदस्यांना केले. ॲड.के.जी.भोसले, ॲड.संदिप राजे भोसले यांनी कायदेविषयक मार्गदर्शन यावेळी केले. हनुमंतराव भांडवे यांनी बजाजनगरच्या मंदिर पाडापाडीचा अनुभव सांगत मंदिर समित्यांनी गाफिल राहु नका.मंदिर बचाव समितीला ताकद द्या असे आवाहन केले. शिवाजी बनकर, एन.डी.कुलकर्णी, साहेबराव घोडके यांनी यावेळी मार्गदर्शन केले.आचार्य कृष्णकांत मुळे महाराज यांनी सिडकोतील धार्मिक स्थळांच्या समस्या मांडल्या व आमच्या देवाला हात लावण्या आधी आम्हाला हात लावावा लागेल असा इशाराही यावेळी दिला.

या कार्यक्रमास ह.भ.प.गंगाधर घुगे महाराज, कृष्णकांत मुळे, बापुसाहेब वाळके, एन.बी.कुलकर्णी, माजी महापौर कला ओझा, नगरसेवक सुमित्राताई हाळनोर, उपजिल्हा संघटक सुनिता देव, नगरसेवक नंदकुमार घोडेले, उपजिल्हाप्रमुख जयवंत ओक, गणु पांडे, तालुका प्रमुख बप्पा दळवी, हनुमंतराव भांडवे, हिरा सलामपुरे, गणपत खरात, सुनंदा खरात, राधाकृष्ण गायकवाड, ॲड.के.जी.भासले, ॲड, संदिप राजे भोसले, विश्वनाथ स्वामी, गोपाल कुलकर्णी, विश्वनाथ राजपुत, राजू खरे, सचिन खैरे, आनंद तांदुळवाडीकर, आशुतोष डंख, सुधीर भाले, विजय सुर्यवंशी, पंढरीनाथ गोंडे पाटील, शिवाजी बनकर, जनजागरण समितीचे अरुण भडगांवकर, शरद चावडा, पुरोहीत संघटनेचे सुभाष मुळे, जयसिंग होलीए, सचिन राठी, नाथा वखरे, जितेंद्र राऊत, नारायण कानकाटे, नारायणसिंग होलीए, सुधाकर औटी, सचिन गोखले, पी.व्ही.दिघोळ, भगवानराव दौंड, दिनकर माळी, बी.जे.गौतम, रतन सावजी, संतोष जाटवे, किशोर उदावंत, संतोष खांडेकर, विनोद पवार, विष्णु पोळ, बाबासाहेब पुंड, खोडे काका, मोठे काका, नारायण जाधव, योगेश रमंडवाल, आबासाहेब डांगे, सुरेश पवार, विजय उवळे आदींसह मंदिर ट्रस्टचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मंदिर बचाव समितीचे सदस्य हे मंदिर ट्रस्टच्या स्थापनेसाठी व कायदेविषयक साठी मार्गदर्शन करतील. काही अडचणी असल्यास प्रा.मनोहर धोंडे, नंदकुमार घोडेले ९४२२७०७५५० कार्यालय प्रमुख डॉ.मोहन जोशी ८८८८९१८९४, एन.बी.कुलकर्णी, हनुमंतराव भोंडवे, शिवाजी बनकर, नारायण जाधव, ॲड.के.जी.भोसले, ॲड.संदिप राजे भोसले यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन खासदार चंद्रकांत खैरे यांनी मंदिर बचाव समितीच्या वतीने केले आहे.

प्रसिध्दी प्रमुख

योगेश पायघन / गणेश वाघ.

कार्यालय : ''खैरे निवास'', वसंत भवन समोर, मच्छली खडक, संभाजीनगर-४३१ ००१. दुरध्वनी : (०२४०) २३३११२५, २३३१२२५. फॅक्स : (०२४०) २३४३०२५

cbkhaire@gmail.com , 8484066606/9604384400

yp4329@gmail.com 7769052525*/8421415255*